|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आयआयटी मुंबई यांच्यासोबत केलेल्या सामजंस्य करारातंर्गत दि. १८ आणि दि.१९ जानेवारी रोजी शिक्षकांसाठी “आपले प्रश्न आपले विज्ञान” प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना आंतरवासिता (इंटर्नशिप) करणे आवश्यक आहे. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना अनुभवजन्य अध्ययन आणि आंतरवासिता सहभाग देण्यासंदर्भात शिक्षकांची कार्यशाळा होणार आहे. दि. १८ जानेवारीला पहिल्या तुकडीला तर दि. १९ जानेवारीला शिक्षकांच्या दुस-या तुकडीला प्रशिक्षण दिले जाईल. महाविद्यालयांनी एका शिक्षकाचे समन्वयक म्हणून नामाकंन करून कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पाठवायचे असून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर कार्यशाळेची नोंदणी लिंक व सविस्तर माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. दि. १५ जानेवारीपर्यंत शिक्षकांची नोंदणी आवश्यक असून अधिक माहितीसाठी कार्यशाळा समन्वयक डॉ. मनीषा इंदाणी किंवा डॉ. संतोष खिराडे यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेत शिक्षणशास्त्र, विद्यार्थी विकास विभाग आणि क्षमता निर्माण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित “आत्मनिर्भर युवती अभियान” या कार्यशाळेचा समारोप बुधवार दि. १० जानेवारी रोजी झाला.

समारोप प्रसंगी मंचावर जळगाव येथील भूमीअभिलेख कार्यालयाच्या उपअधिक्षक शीतल लेकुरवाळे, प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनीषा इंदाणी, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. संतोष खिराडे व डॉ. स्वाती तायडे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना श्रीमती लेकुरवाळे यांनी सांगितले की, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यश संपादन करण्यासाठी निश्चय करून आपल्या मनाशी खुणगाठ बांधणे गरजेचे आहे. प्रयत्नांना योग्य दिशा देणे गरजेचे आहे. प्रयत्नांमध्ये संपूर्ण समर्पण असणे आवश्यक असते तेव्हाच अपेक्षित यश साध्य करता येते. आपल्या प्रेरणात्मक व्याख्यानाच्या माध्यमातून Determination, Direction and Dedication हा यशाचा मंत्र त्यांनी सांगितला.

विद्यार्थिनी प्रियंका पवार हीने सहा दिवसाच्या कार्यशाळेचा आढावा सादर केला. मोनिका गावित हीने मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेत ७५ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. रणजित पारधे तर सहसमन्वयक म्हणून प्रणाली सोनवणे यांनी काम पाहिले.

………………………………………………………………………………………………………………..

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १० जानेवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी